
REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.2331(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 7 | ISSUE - 10 | JULY - 2018

# आण्णा भाऊंच्या साहित्यातील स्त्री चित्रण

डॉ. दत्तात्रय बारबोले
मराठी विभाग प्रमुख, शंकरराव मोहिते महाविद्यालय, अकलूज.

## प्रस्तावना



जागतिक परिप्रेक्षातून शोषीतांच्या साहित्याचा विचार करताना शोषीत कोण? या प्रश्नांचे उत्तर आपणास ब यापैकी माहिती असते ते एक आपण माणूस म्हणून परंतु लेखक, संशोधक यांच्या लेखी या परिषदेला अपेक्षित असणारे वंचित त्यांचा विचार करताना समाजातील उपेक्षित, दुर्लक्षित, शोषीतघटक जेव्हा आपण शोधण्याचा प्रयत्न करतो. तेव्हा या प्रत्येक घटकाला आपण पुरेपूर आणि योग्य न्याय देवू शकतो का? मी माझ्या पुरते तरी नाही असे म्हणेन. कारण समाजातील जे काही शोषीतघटक गोष्ट आहे. त्यांची तंतोतंत संपुर्ण माहिती आजमितीला तरी कोणासही माहिती असणार नाही कारण ही अशक्य कोटीतील गोष्ट आहे. परंतु जेव्हा एखादा लेखक उपेक्षित वंचित, शोषीतयांच्या विषयी लिहितो तेव्हा त्यांची शोषीतसमाजाची निरीक्षण शक्ती किती अचाट असू शकते याची थोडी फार कल्पना येते. थोडी फार हा शब्द मी खूप काळजीपुर्वक लिहिताय कारण मी माझा निबंधात अण्णा अण्णा भाऊराव साठे यांच्या कादंबरीतील शोषीत स्त्रीयांच्या आर्थिक समस्या मांडणार आहे. अण्णा जगप्रसिध्द लेखक असले तरी ते स्वत: एक शोषीत आहेत. आजही त्यांची साहित्याच्या, विचारांच्या माध्यमातून प्रतिष्ठा शंभर टक्के टिकून आहे. जगभरातील शोषीत कामगार वर्ग आजही त्यांच्या विचारांचा अभ्यास करतो आहे. भारतातील महाराष्ट्र राज्य त्यातील सांगली जिल्हयाच्या नकाशात अस्तित्व दिसेल न दिसेल असं असणारं १९ व्या शतकाच्या सुरवातचे वाटेगांव पुन्हा त्यातील काहीच कारण नसताना क्षुद्र समजली जाणारी जात मांग अस हे सगळं, तत्कालीन काळ, तत्कालीन परिस्थिती, समाज हे सगळं त्यांनी खुप बालवयात, न्याहाळलंय, अनुभवलयं, सोसलंय, सतत अन्यायचं त्यातून त्यांचा पिंड कसा घडला असता. आजच्या आधुनिकीकरणाच्या विचारांनुसार, पण तसं काही नाही. अशा बिकट परिस्थितीतून, स्वयंप्रेरणेतून त्यांचा स्वत:चा असा समाजाकडे पाहाण्याचा मानवतावादी दृष्टीकोन निर्माण झाला. त्यानुसार त्यांनी मानवतावादाचे चित्रण त्यांनी आपल्या समग्र साहित्यातून केले. जो—जो नाकारला गेलाय तो तो त्यांच्या साहित्याचा नायक आहे. ती माणसं आहेत. याचं भान आयुष्यभराचा नकार पचवूनही टिकवून ठेवलं ही काही साधी गोष्ट नाही. ती अण्णांनी साध्य केलीय. त्यांच्या साहित्याचा अभ्यास करायला खूप विषय आहेत. त्यातीलच मी आजच्या या परिषदेसाठी अण्णांच्या कादंबरीतील स्त्रीयांच्या आर्थिक शोषणाचा मुद्दा मी मांडणार आहे.

जग, जागतिक आणि जागतिकीकरण हे शब्द आज विज्ञानयुगात सहज व्यवहारातील झालेले आहेत. ही सहजता २१ व्या शतकातील मानवी समाजाचे भूत, वर्तमान ब— यापैकी भविष्यकाळ व्यापणारी आहे. आजच्या मानवाला ब्रह्मांड समजावून घ्यावयाचे आहे. त्यासाठी विज्ञानाची मदत अनिवार्य ठरली. कोणत्याही गोष्टीचा शोध घेण्यासाठी विज्ञानाचा वापर करत आधार घेत जी संशोधन झाली त्यामध्ये साहित्य, मानसशास्त्र आणि कला यांचाही विचार करता येतो. कोणत्याही प्रकारचे संशोधन करताना वैज्ञानिक दृष्टीकोन हा अनिवार्य ठरतो. कारण प्रत्येक संशोधनाचे स्वत:चे असे एक शास्त्र असते.

साहित्याच्या क्षेत्रातील लेख संशोधन यांचा विचार करता भाषेच्या शास्त्रांचा वापर अगदी सहजपणे होत असतो. आपण सगळे नेहमी असे म्हणतो की, साहित्यात समाज आणि समाजात साहित्य असते.

अण्णांच्या कादंबरी वाड्मयातील आर्थिक समस्या लक्षात घेता त्या गरीब व श्रीमंत, भांडवलदार व श्रमिक या स्तरांवर योजलेल्या दिसून येतात. समाजवाद आणि मार्क्सवाद यांच्या विचारसरणीतून मांडलेल्या आर्थिक समस्या हया समाजातील असणाऱ्या विविध प्रश्नांपैकी 'गरज' व शोषणया पध्दतीत मोडतात. नेहमी आपल्या कर्तव्याची जाणीव ठेवून जगणारी माणसे आपल्या चाकोरीतून जगत असतात. चाकोरीबध्द जीवनामुळे त्यांना बऱ्यांचदा समाजातील इतरांच्या दु:स्वास करणाऱ्या स्वभावाची जाणीव नसते. त्यावेळी त्यांची होत असणारी फसगत शिवाय सामाजिक राजकीय, कार्यकर्त्यांचा कधी चांगुपणा तर कधी स्वार्थीपणा यातून त्यांच्या जीवनात निर्माण होणाऱ्या आर्थिक समस्यांची जाणीव अण्णांच्या कादंबऱ्या अभ्यासताना दिसून येते.

मानवी जीवनात अर्थव्यवस्थेला अनन्यसाधारण महत्व आहे. आजचा समाज हा पूर्णत: अर्थव्यवस्थेशी निगडीत आहे. या आर्थिक व्यवहारामुळे एका बाजूने समाजाला विकास जोमाने होवू लागला. तर दुसऱ्या बाजूने समाजाचा ऱ्हास होवू लागला. अर्थ किंवा पैसा हे केवळ विनिमयाचे साधन म्हणून न रहाता तिचा सत्ता मिळविण्यासाठी वापर होवू लागला आणि यातूनच समाजाला एका भयंकर प्रश्नाला सामोरे जावे लागलले. आर्थिक स्थैर्य मिळविण्यासाठी व्यक्तिची धडपड कशी चालू असते. याची मांडणी अण्णा भाऊनी अर्थशास्त्राच्या कोणत्याही सिध्दांताशिवाय आपल्या कादंबऱ्यातून केलेली आहे. व्यक्तिला आर्थिक सुबत्तेने सामाजिक स्थैर्य लाभते. समाजातील बहुतांश वर्ग हा आपल्या उपजिविकेसाठी अर्थाजनासाठी धडपडतो आहे. कारण या समाजाला दोन वेळच्या भाकरीचा प्रश्न सोडवयाचा आहे. या अर्थप्राप्तीसाठी सामान्य माणसाला समाजात जगण्यासाठी कोणत्या प्रकारचा संघर्ष करावा लागतो याचे विवेचन अण्णांनी आपल्या कादंबऱ्यातून केलेले आहे.

अण्णाभाऊंचे आर्थिक विचार मांडताना मच्छिंद्र सकटे लिहितात 'अण्णाभाऊंच्या आर्थिक विश्लेषणास भूक आणि दृ:ख हा विषय होता. भूक आणि दु:ख हीच अण्णा भाऊंच्या लेखनामागील खरी प्रेरणा आहे. 'भूक जेव्हा भागवली जात नाही तेव्हा दु:ख आणि दैन्य निर्माण होते आणि ते जेव्हा अण्णा भाऊंच्या मनाला भिडते' तेव्हा अण्णा भाऊंची लेखणी धारदार होते. तलवार होते आणि मग ती भुकेकंगालाच्या पोटाशी भिडते. भूक आणि दु:ख यातून उपेक्षित आणि वंचितांची अवहेलना कशी होते हे संगत असताना मानव समाजातील अत्यंत महत्वाचा घटक असणारा 'स्त्रीवर्ग' या वर्गाच्या शोषनाची पातळी किती उपहासाची असते याची उदाहरणे त्यांनी आपल्या 'चित्रा', 'रूपा', 'वैजयंता', 'चंदन' व 'संघर्ष' या कादंबऱ्यातून दिलेली आहेत. अणांच्या कादंबऱ्यातील स्त्री व्यक्तिरेखांवर त्यांच्या कालखंडातील विचारसरणीचा प्रभावाबरोबरच भविष्यकाळातील प्रश्न व समस्यांचा वेध घेत त्यावर उपाययोजना सुचविलेल्या आहेत. अशा प्रकारच्या वस्तूस्थितीचा विचार वरील अवतरणात दिसून येतो.

अण्णांनी त्याच्या कादंऱ्यातून समाजातील विविध घटना, प्रसंग व व्यक्ति यांचेही चित्रण केलेले दिसते. समाजवादाबरोबरच त्यांच्या कादंबऱ्यातून आलेला मार्क्सवाद हा तत्कालीन राजकीय चळवळींच्या वातावरणाचा प्रभाव लक्षात आणून देतो. जीवनासाठी कला, बुध्दी, भावना, परिस्थिती व प्रसंग यांची सांगड घालताना आढळते. यावरून अण्णा हे सुरूवातीला मार्क्सवादी असूनही ते आंबेडकरवादीही होते हे एक वास्तव आहे. 'मार्क्सला अभिप्रेत असणारी वर्गमुक्ती आणि बाबासाहेबांना अभिप्रेत असणारी 'वर्णमुक्ती' या दोन्ही विचारांचा मिलाफ अण्णांच्या साहित्यातून स्पष्ट दिसतो'.२ अशा परिस्थितीतील काळात स्त्रियांच्यासाठी फारशी अनुकुल परिस्थिती नव्हती. तरीही आंबेडकरांच्या विचारांना अनुसरून समाजसुधारणा, शिक्षण यासारख्या विविध क्षेत्रात स्त्रिया घरच्या व्यक्तिंचा विरोध स्विकारून आपल्यासारखी दु:खी माणसे नजरेसमोर आणून त्यांच्यापेक्षा आपण काहीतरी वेगळे कर्म करावे. आपले दु:ख विसरावे व आपला समाज जीवनासाठी काहीतरी उपयोग व्हावा, कोणत्याही परिस्थितीत जगण्यासाठी धडपडावे. या हेतूने त्या घराबाहेर पडू लागल्या, स्वत:चे अस्तित्व शोधत त्या अर्थार्जनही करू लागल्या. याचे चित्रण चित्रा' व रूपा' या कादंबऱ्यातून येते.

'रूपा' कादंबरीतील विधवा मथी आपली आर्थिक गरज भागविण्यासाठी दृष्ट गजा नांगरेला आपलेसे करून तरूण 'रूपा ला मिळवून देण्याचे वनज गजा नांगरेला देते. मथी ही पैशासाठी दुसऱ्या एका स्त्रीया सौदा कशाप्रकारे करते हे या कादंबरीतून रेखाटले आहे. तर 'चित्रा' या कादंबरीतूनही स्त्रीया तिच्या जीवनात आर्थिक स्थैर्य मिळविण्यासाठी कोणावर तरी विश्वास ठेवते आणि ती फसली जाते. याचे सविस्तर मांडणी समर्पकपणे करताना मानवी समाजाला उपयुक्त असणारी आर्थिक सुबत्ता जशी सुखमय वाटणारी असते तशीच ती विनाशाकडेही नेणारी असते याचे चित्रण येते.

यावरून अण्णांना सामान्यातील सामान्य व गरीब लोकांच्या कष्टाची किती जाणीव होती हे स्पष्ट होते. पिढयान्पिढया त्यांचे झालेले 'शोषण, रात्रंदिवस कष्ट करूनही न संपणारे दारिद्रय हे सगळे विषय त्यांच्या चिंतनातन नष्ट होतात. कितीही संकटे आली तरी त्यातून मार्ग काढण्याची कला अण्णांच्या नायिकांत दिसून येते. व तसा आशावादही त्यांच्या कथात्म साहित्यातून दिसून येतो. कोणत्याही नायिकेचे त्यांनी अध:पतन केलेले नाही. या अनुषंगाने 'वैजयंता', 'चंदन' व 'संघर्ष' या कादंबऱ्यांच्या आधारे पहाता येते.

'वैजयंता' मधील गजराई ही उत्तम तमाशा कलावंत आहे. या स्त्री कलावंताकडे समाजाचा दृष्टीकोन हा एक 'वस्तू' या स्वरूपाचा असल्यामुळे गजराईला नाईलाजास्तव वैजयंताला जन्म द्यावा लागतो. पोटच्या मुलींला जगविण्यासाठी तिला पुन्हा तमाशात नाचावे लागते. मुलीला जन्म दिला पण वडिलांचे नांव नाही ही खंत गजराईला आहे. सामाजिक स्तरावरचे उपरेपणाचे दु:ख पचवत ती जगणे पसंत करते. प्रसूतीनंतरच्या अवघ्या बाराव्या दिवशी ती तमाशात नाचायला जाते. स्त्रीला जगण्यासाठी जी धडपड करावी लागते त्याअनुषंगाने अण्णा गजराई विषयी लिहीतात 'गजराबाईच्या कलेला कष्टाच रूप आलं होतं बाराव्या दिवशीच ती आपली वैजयंता घेवून थिएटरमध्ये नाचायला गेली आणि विंगमध्ये बाळाला निजवून तमाशा करू लागली. पुढे तो तिच्या जीवनाचा क्रमच झाला'३ परिस्थितीने आगतिक झालेली गजराबाई जगण्यासाठी, निर्माण झालेली आर्थिक अडसर दूर करण्यासाठी, कष्टाची तयारी ठेवते परंतु दुसरी तमाशा कलावंत चंद्राबाईकडून अपमान होतो आणि गजराबाई तमाशात नाचाये बंद करून मोलकरणीचे काम करते. तिथेही तिच्या दारिद्रयाचे दशावतार संपत नाहीत. ज्या घरी ती काम करते तिथल्या मालकीच्या भाच्याची नजर वैजयंतावर पडते. यासाठी तिला दहा रूप्याचे अमिष दाखविले जाते. जीवनाची घडी घालता घालता स्त्रीच्या आर्थिक प्रश्नाने तिचे जीवन कसे विस्कटले जाते आणि त्यासाठी स्त्रीला आर्थिक प्रश्न सोडवताना करावा लागणारा संघर्ष किती जीवघेणा असतो हे अण्णा भाऊ वैजयंतामधून मांडतात.

'चंदन' कादंबरीतील 'चंपा' आणि 'चंदन' या दोन स्त्रीया दयाराम ट्रान्सपोर्ट मध्ये माती भरण्याचे काम करून जगत असतात. यातील चंपा इथल्या समाजव्यवस्थेचा बळी आहे. ती वेश्या व्यवसाय करते. परंतु माणूसकीची जाण असणारा रंग्या तिला या नरक यातनेतून बाहेर काढतो तर चंदन अनाथ जगू बरोबर विवाह करते. जगूचा खाणीत काम रहाते. या कादंबरीतील दोन स्त्रीया व दोन पुरूष यांतील असणारे माणूसकीचे नाते चित्रित केलेले आहे. काही वेळा नियतीला वाईटाबरोबर चांगल्याही गाष्टी मान्य नसतात. याचा निर्वाळा या कादंबरीवरून नक्कीच येतो. 'संघर्ष' कादंबरीची नायिका सुलभा ही वडिलांच्या म्हणण्यानुसार स्वत:चा आर्थिक प्रश्न सोडवते. वकीलांमार्फत माणूसकी नसलेल्या नवऱ्याला प्रसंगाला घाबरत नाही. नकारावर मात करत कठीण प्रसंगापेक्षा मोठे होण्याचे सामर्थ्य या स्त्रियांच्यात आहे. हे अण्णांनी त्यांच्या समाज निरीक्षणातून तसेच स्वत:ला तसेच तसेच आपल्या अनुभवाला आलेल्या अनेक प्रसंगांना अनुसरून स्त्रियांच्यात आहेत्र हे अण्णांनी त्यांच्या समाज निरीक्षणातून तसेच स्वत:ला तसेच आपल्या अनुभवाला आलेल्या अनेक प्रसंगांना अनुसरून स्त्रियांचे आर्थिक प्रश्न आपल्या कादंबऱ्यातून यशस्वीपणे मांडलेले आहेत.

## सारांश :

अण्णांनी जे स्त्रियांचे आर्थिक प्रश्न मांडलेत त्या प्रश्नांची उकल करता येते हे अण्णांनी उदाहरणा दाखल सांगितलेले आहे. स्त्रियांचे आर्थिक समाजवास्तव, त्यांचा अशिक्षितपणा, सोशिकता या बरोबर ध्येय, नकारात्मक परिस्थितीला शरण न जाणे या कारणातून निर्माण झालेल्या आर्थिक समस्या, कुटुंबाची

जबाबदारी संभाळताना सामाजिक परिस्थितीलाही तीला सामोरी जावे लागते. या सगळयातून सुटका व्हावी यासाठी ती नेहमी काबाडकष्ट उपसताना दिसते. त्यासाठी प्रत्येक घटकातील स्त्री अर्थार्जनासाठी धाडसाने घराबाहेर पडताना दिसते. या स्त्रिया समाजातील दु:खे पाहून स्वत:चे दु:ख विसरून कुटुंब समाज यासाठी चांगले कार्य करण्याचे ध्येय बाळगतात. स्वत:चे अर्थाजन करण्यासाठी कोणत्याही प्रकारच्या कष्टाचे काम करण्यासाठी त्या तयार असतात. जगण्यासाठी कष्ट करणारी माणसेही अण्णांनी आर्थिकदृष्टया दुर्बल ठेवली असली तरी त्यांची जगण्यावरची निष्ठा मात्र बळकट केलेली आहे.

## संदर्भ :

१. सकटे मच्छिंद्र – 'अण्णा भाऊ साठे एक सत्यशोधक' प्रज्ञा प्रकाशन कोल्हापूर, प्रथमावृत्ती २००५ पृ. क्र. १७.
२. सकटे मच्छिंद्र – उनि पृ. प्र. २२
३. डांगळे अर्जुन – 'लोकशाहीर अण्णा भाऊ साठे निवडक वाङ्मय, (संपा) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, व्रतियावृत्ती २००६ पृ. क्र. १०३०.